प्रा.सं.के.अम/प्रक्रे/२६८/२०२४ दि. २८/०५/२०२४

निविदा सूचना

विषय:- सन २०२४-२५ व २०२५-२६ च्या आर्थिक वर्षासाठी प्रादेशिक संशोधन केंद्र,(डॉ. पं.दे.कृ.वि.), अमरावती अंतर्गत अ भा स सो सं प्रकल्पांतर्गत प्रयोगाची संबंधित अकुशल व तांत्रिक कामे कंत्राट पद्धतीने करण्याकरिता वैध परवानाधारक कंत्राटदाराकडून निविदा दर (कोटेशन) बोलविण्याबाबत..

वरील विषयाच्या अनुषंगाने सविनय सादर करण्यात येते कि, प्रादेशिक संशोधन केंद्राच्या अमरावती येथील अखिल भारतीय समन्वित सोयाबीन संशोधन प्रकल्पांतर्गत दरवर्षी वनस्पतीशास्त्र विभाग, कृषिविद्या विभाग, वनस्पती रोगशास्त्र विभाग व कीटकशास्त्र विभागात विविध संशोधनात्मक प्रयोग घेतली जातात. जवळपास ६.३५ हे. क्षेत्रातील संशोधन प्रयोगा मधील विविध कामे जसे कि, ट्रॅक्टरद्वारे शेती मशागत करणे, टोकन पद्धतीने पेरणी करणे, फवारणी, तण नियंत्रण, ओलित, कापणी, मळणी, संशोधन प्रयोगाची निरीक्षणे नोंदवणे ई. कामांकरिता स्त्री व पुरुष मजुरांची आवश्यकता असते. सदर कामे कंत्राटी पद्धतीने करवून घेण्यासंदर्भात कुलसचिव कार्यालाचे परिपत्रक जा.क्र./बीएमसी/रोम/२०१५ दि. ३०.०६.२०१५ (सी/ ९ ते सी/१७) अन्वये सर्व विभागाचे प्रयोगातील हंगामी कामे कंत्राटदारामार्फत करण्याचे सूचित केलेले आहे. संबंधित कामे कंत्राटी पद्धतीने करण्याकरिता वैध परवानाधारक कंत्राटदाराकडून निविदा दर खालील प्रमाणे अटी व शर्तीस अधीन राहून मागविण्यात येत असून निविदा मसुदा/निविदेचे प्रारूप सोबत जोडण्यात आलेले आहे.

अटी व शर्ती

१. निविदा पत्रक/कोटेशन कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १०.०० ते दुपारी ५.३० या वेळेत स्वीकारल्या जातील.
२. निविदा/कोटेशन **प्रमुख, प्रादेशिक संशोधन केंद्र (डॉ.पं.दे.कृ.वि.), मोर्शी रोड, अमरावतीयांचे नावाने सीलबंद** लिफाफामधे पाठवावी.
३. कंत्राटदाराकडे संबंधित कामाचा वैध परवाना असणे बंधनकारक आहे. कंत्राटदाराला परवाना व संबंधित इतर सर्व आवश्यक कागदपत्रे या कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील.
४. कंत्राटदारास मिळालेल्या कामाच्या देयकाचे १० टक्के रक्कम सुरक्षा ठेव (Security Deposit) म्हणून संबंधित विभागाकडे जमा करावी लागेल व काम पूर्ण झाल्यावर सुरक्षा ठेव परत मिळण्याकरिता संबंधित विभागाचे प्रभारी अधिकारी यांचे कडे अर्ज करावा लागेल त्यानंतर सुरक्षा ठेव परत करण्यात येईल.
५. निविदा/कोटेशन मधील संबंधित कामे कंत्राट पद्धतीने करण्याचे दर नियमाप्रमाणे सर्व करासह नमूद करण्यात यावे तसेच त्या कराचा विहित मुदतीमध्ये भरणा करण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित निविदाधारकाची राहील. करा संबंधी कोणतीही तक्रार आल्यास विद्यापीठ जवाबदार राहणार नाही.
६. कंत्राट पद्धतीने प्रक्षेत्रावरील संशोधन प्रयोग संबंधित कामे तसेच वाहनविभाग संबंधित तांत्रिक कामे करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या स्त्री/पुरुष मजुरांचे व्यवस्थापनाची संपूर्ण जबाबदारी संबधित कंत्राटदाराची राहील.
७. प्रादेशिक संशोधन केंद्र, अमरावती अंतर्गत संपूर्ण विभागाचे प्रक्षेत्रावरील संशोधन प्रयोग संबंधित कामे करीत असतांना पिकाचे/फळबागेचे तसेच वाहनविभाग संबंधित तांत्रिक कामे करीत असतांना यंत्राचे/वाहनाचे/नवीन सुट्या भागांचे ई. नुकसान झाल्यास विद्यापीठ प्रशासनाने ठरवून दिलेल्या निकषाप्रमाणे नुकसान भरपाई संबंधित कंत्राटदाराकडून वसूल करण्यात येईल.
८. प्रक्षेत्रावरील विभागांवर संशोधन प्रयोग संबंधित कामे तसेच वाहनविभाग संबंधित तांत्रिक कामे करतेवेळी कुठलीही दुर्घटना/अपघात/जीवितहानी झाल्यास हे कार्यालय किंवा कोणताही कर्मचारी/अधिकारी किंवा विद्यापीठ जवाबदार राहणार नाही. याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित कंत्राटदाराची राहील.

९. विभागावर देण्यात आलेले संशोधन प्रयोग संबंधित कामे तसेच वाहनविभाग संबंधित तांत्रिक कामे पूर्ण करण्यात यावे, कामाबाबत विभागावरून तक्रार आल्यास किंवा काम अर्धवट राहील्यास सदर कामाचे देयक काढण्यात येणार नाही.

१०. विद्यापीठ प्रशासनाने वेळोवेळी निर्देशित केलेल्या नियमांचे पालन करणे संबंधित कंत्राटदारांना बंधनकारक राहील.

११. कंत्राटदारांनी देयक सादर करतेवेळी बँक खाते बाबतची संपूर्ण माहिती सादर करावी, अन्यथा देयक अदा केले जाणार नाही.

१२. या कार्यालयातर्फे कंत्राटदारास संशोधन प्रयोग संबंधित कामे करण्याकरिता कोणत्याही प्रकारचे साहित्य पुरविण्यात येणार नाही. संबंधित काम करण्याकरिता आवश्यक साहित्य उपलब्ध करून देण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित कंत्राटदाराची राहील.

१३. कंत्राटदारास संशोधन प्रयोग संबंधित कामाचे देयक काम पूर्ण व विहित वेळेत पूर्ण केल्यावर तसेच संबंधित विभागाचे प्रभारी अधिकारी यांनी काम समाधानकारक झाल्याचे प्रमाणित केल्यानंतरच कामाचे देयक पारित करण्यात येईल.

१४. प्रक्षेत्रावरील विभागांवर संशोधन प्रयोग संबंधित कामे तसेच वाहनविभाग संबंधित कामे करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या स्त्री/पुरुष मजुरांना, कामगार (Labour Act) कायद्यानुसार किमान वेतन, विमा संरक्षण, भविष्य निर्वाह निधी देणे, कॅशलेस पद्धतीचा अवलंब करणे तसेच सर्व प्रकारचे करांचा नियमाने व नियमित भरणा करणे इत्यादीची संपूर्ण जबाबदारी संबंधित कंत्राटदाराची राहील.

१५. प्रक्षेत्रावरील विभागांवर संशोधन प्रयोग संबंधित कामे तसेच वाहनविभाग संबंधित कामे करीत असतांना कोणताही वाद विवाद निर्माण झाल्यास सदर वाद विवाद विद्यापीठ विधी विभागाचे अधिकारी/ मा. संशोधन संचालक, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांचे समक्ष मिटविला जाईल व अंतिम निर्णय मा. संशोधन संचालक, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांचा राहील आणि तो सर्वांना मान्य करणे बंधनकारक राहील.

१६. प्रक्षेत्रावरील विभागांवर संशोधन प्रयोग संबंधित कामे तसेच वाहनविभाग संबंधित तांत्रिक कामे हि २४ महिन्यातील खरीप, रब्बी व उन्हाळी या तिन्ही हंगामाकरिता असून कामाचे दर २४ महिन्याकरिता वैध राहतील.

१७. प्रादेशिक संशोधन केंद्र, अमरावती कार्यालय अंतर्गत विभागांवर संशोधन प्रयोग संबंधित कामे तसेच वाहनविभाग संबंधित तांत्रिक कामे करण्यासाठी पुरविण्यात आलेले कंत्राटी कर्मचारी हे १८ वर्षाच्या वर असावे तसेच ६० वर्षापेक्षा कमी असावे व त्यास कोणत्याही प्रकारचे अपंगत्व नसून ते शारीरिक दृष्ट्या सक्षम असावेत. याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित कंत्राटदाराची राहील.

१८. संशोधन प्रयोग संबंधित कामे तसेच वाहनविभागसंबंधित तांत्रिक कामे करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या स्त्री/पुरुष मजुरांचे व्यवस्थापनाची संपूर्ण जबाबदारी संबधित कंत्राटदाराची राहील.

१९. प्रादेशिक संशोधन केंद्र, अमरावती कार्यालय अंतर्गत वाहनविभाग संबंधित तांत्रिक कामे करण्यासाठी पुरविण्यात आलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांकडे संबंधित तांत्रिक कामची पदविका/आयटीआय प्रमाणपत्र/वाहन चालविण्याचा परवाना व कामाचा अनुभव असणे बंधनकारक राहील.

२०. सर्व अटी व शर्ती मान्य असल्याचे व संपूर्ण जबाबदारी कंत्राटदाराची असल्याचे रु. १०० चे स्टंप पेपर वर करारनामा सादर करणे संबंधित कंत्राटदारास बंधनकारक राहील.

२१. पावसामुळे किंवा ईतर कोणत्याही घटनेमुळे एका दिवसात ८ तासाचे काम झाले नसल्यास उरलेल्या तासांची भरपाई येणाऱ्या दिवसात करणे कंत्राटदाराला बंधनकारक राहील.

२२. वरीलप्रमाणे अटी व शर्तीस अधीन राहून सोबत जोडलेल्या निविदा मसुदा तपशिला नुसार दि. 10/ 06 /२०२४ रोजी पर्यंत कार्यालयीन वेळेत निविदा सीलबंद लीफाफा मध्ये सादर करावी.

**प्रमुख**
**प्रादेशिक संशोधन केंद्र**
**डॉ. पं.दे.कृ.वि., अमरावती**

निविदा (कोटेशन) मसुदा

विषय:- सन २०२४-२५ व २०२५-२६ च्या आर्थिक वर्षासाठी प्रादेशिक संशोधन केंद्र,(डॉ. पं.दे.कृ.वि.), अमरावती अंतर्गत अ भा स सो सं प्रकल्पांतर्गत प्रयोगाची संबंधित अकुशल व तांत्रिक कामे कंत्राट पद्धतीने करण्याकरिता वैध परवानाधारक कंत्राटदाराकडून निविदा दर (कोटेशन) बोलविण्याबाबत..

| अ.क्र. | करावयाचे काम | कामाचा तपशील | दर (रू./हे) | दर (प्रती व्यक्ती प्रती दिवस (८ तास)) | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | नांगरणी (ट्रॅक्टर व ड्रायव्हर सहित) | ट्रॅक्टरने दोन फाळी (प्रती हेक्टर) | | | |
| | | ट्रॅक्टरने तीन फाळी (प्रती हेक्टर) | | | |
| १ अ) | नांगरणी (ट्रॅक्टर कार्यालयाचा असल्यास फक्त ड्रायव्हर) | ट्रॅक्टरने दोन फाळी (प्रती हेक्टर) | | | |
| | | ट्रॅक्टरने तीन फाळी (प्रती हेक्टर) | | | |
| २ | मोगडणे (ट्रॅक्टर व ड्रायव्हर सहित) | फंटा वाही /पंजी (प्रती हेक्टर) | | | |
| २ अ) | मोगडणे (ट्रॅक्टर कार्यालयाचा असल्यास फक्त ड्रायव्हर) | व्ही पास /पंजी (प्रती हेक्टर) | | | |
| ३ | वखरणे (ट्रॅक्टर व ड्रायव्हर सहित) | ट्रॅक्टरने (प्रती हेक्टर) | | | |
| | | ट्रॅक्टरने रोटावेटर (प्रती हेक्टर) | | | |
| | | पट्टीपास / जांभूळवाही (प्रती हेक्टर) | | | |
| ३ अ) | वखरणे (ट्रॅक्टर कार्यालयाचा असल्यास फक्त ड्रायव्हर) | ट्रॅक्टरने (प्रती हेक्टर) | | | |
| | | ट्रॅक्टरने रोटावेटर (प्रती हेक्टर) | | | |
| | | पट्टीपास / जांभूळवाही (प्रती हेक्टर) | | | |
| ३ ब) | वखरणे | बैलाने (वखर, मजुरासहीत)/ हे. | | | |

| अ.क्र. | करावयाचे काम | कामाचा तपशील | शेरा |
|---|---|---|---|
| १ | प्रक्षेत्रावरील अकुशल कामे करणे | अनु. क्रमांक १ ते १९ पर्यंत सर्व कामे प्रती व्यक्ती प्रती दिवस (८ तास) | |
| २ | काशा/ धसकटे/ कचरा वेचणे | प्रती व्यक्ती प्रती दिवस (८ तास) | |
| ३ | शेणखत भरणे /उतरविणे/वाहतूक ५ टन | वाहन (ड्रायव्हर-ट्रॅक्टर – ट्रॉली सहित) व मजुरासह (प्रती ट्रॉली) (अंदाजित अंतर १२ किमी) | |
| | | प्रती ट्रॅक्टर ट्रॉली मजुरासह (ड्रायव्हर वगळून ट्रॅक्टर – ट्रॉली विभागाची राहील) | |
| ४ | शेणखत पसरविणे ५ टन | प्रती व्यक्ती प्रती दिवस (८ तास) | |
| ५ | टोकन पद्धतीने पेरणी | जास्त अंतर (प्रती व्यक्ती प्रती दिवस (८ तास)) | |
| | | कमी अंतर (प्रती व्यक्ती प्रती दिवस (८ तास)) | |
| ६ | पेरणीनंतर पक्षी हाकलणे | प्रती व्यक्ती प्रती दिवस (८ तास) | |
| ७ | निरीक्षणे घेणे | प्रती व्यक्ती प्रती दिवस (८ तास) | |
| ८ | पिक विरळणी | जास्त अंतरावरील पीक( प्रती व्यक्ती प्रती दिवस (८ तास)) | |
| | | कमी अंतरावरील पीक प्रती व्यक्ती प्रती दिवस (८ तास)) | |
| ९ | डवरणी/कोळपणी | १ बैलजोडी २ मजुरासह (प्रती दिवस ८ तास) | |
| | | ट्रॅक्टर व ड्रायव्हर सहित (प्रती दिवस ८ तास) | |
| | | ट्रॅक्टरने डवरणी/कोळपणी करणे (प्रती दिवस ८ तास) (ट्रॅक्टर कार्यालयाचा राहील) | |
| १० | खुरपणी / निंदन | खरीप पिके : प्रती व्यक्ती प्रती दिवस (८ तास) | |
| | | रब्बी पिके : प्रती व्यक्ती प्रती दिवस (८ तास) | |
| ११ | वरखत देणे | बांगडी पद्धतीने : प्रती व्यक्ती प्रती दिवस (८ तास) | |
| | | हाताने फेकणे : प्रती व्यक्ती प्रती दिवस (८ तास) | |
| १२ | पिकला पाणी देणे/ रान भिजवणे | मोकाट पद्धत : प्रती व्यक्ती प्रती दिवस (८ तास) | |
| | | स्प्रींकलर पद्धत : प्रती व्यक्ती प्रती दिवस (८ तास) | |
| १३ | फवारणी | साधा स्प्रे : प्रती व्यक्ती प्रती दिवस (८ तास) | |
| | | पावर स्प्रे : प्रती व्यक्ती प्रती दिवस (८ तास) | |
| | | पावर स्प्रे : (प्रती तास स्प्रे पंप व पेट्रोलसह) | |

| | | | |
|---|---|---|---|
| १४ | पीक काढणी/ कापणी | सोयाबीन/ उडीद कापणी व खळयावर जमा करणे व बडवणे : प्रती व्यक्ती प्रती दिवस (८ तास) | |
| | | गहू कापणे व बांधने, खळयावर जमा करणे व बडवणे : प्रती व्यक्ती प्रती दिवस (८ तास) | |
| | | हरभरा कापणे, गोळा करणे व बडवणे : प्रती व्यक्ती प्रती दिवस (८ तास) | |
| १५ | कापूस वेचणी | प्रती व्यक्ती प्रती दिवस (८ तास) | |
| १६ | बियाणे साफ करणे, वजनघेणे | साफ करून कार्यालयात आणून वजन करणे : प्रती व्यक्ती प्रती दिवस (८ तास) | |
| १७ | दांड व वरंब तयार करणे | प्रती व्यक्ती प्रती दिवस (८ तास) | |
| १८ | धसकटे वेचणे | प्रती व्यक्ती प्रती दिवस (८ तास) | |
| १९ | कपाशी स्वच्छ करून जिंनिंग करणे | प्रती व्यक्ती प्रती दिवस (८ तास) | |
| २० | प्रक्षेत्रावरील कुशल/तांत्रिक कामे करणे | प्रती व्यक्ती प्रती दिवस (८ तास) उदा. निरीक्षणे घेणे, पाईपलाईन लिकेज जोडणे, स्प्रे पंप दुरुस्ती ई. | |

निविदा सुचने मधील संपूर्ण अटी व शर्ती मला सर्वस्वी मान्य आहेत.

ठिकाण:-

स्वाक्षरी

दिनांक:-

नाव व संपूर्ण पत्ता